# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## मु.मा.आ. नों.क्र.२२०३/२०१८ रा.मा.आ. अपील क्र. ७९७/२०१९

**अपिलार्थी श्री. अरविंद चौहान**
द्वारा ४/१४ महावीर अपार्टमेंट, मंचुभाई रोड,
मालाड (पुर्व), मुंबई-४०००९७.

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहा. अभियंता (इ व का) आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा विभाग कार्यकारी अभियंता आर/उत्तर विभाग,**
बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,
संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०७.१०.२०१९**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २७.११.२०१७ | - | ०५.०१.२०१८ | २२.०१.२०१८ |

अपिलार्थीने आयोगाकडे दि. १५.०५.२०१८ रोजी खालील कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे:-

"No Inspection and No Documents were given by concerned PIO- Mr. Pramod Waghmare even after visiting several times to the respected office (R/North Ward- Building and Factory Department) after the order passed of the First Appeal dated 22.01.2018."

अपिलार्थीने त्यांचा अर्ज दि. २७.११.२०१७ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

A. "Provide me the legal documents which supports and proves the structure authorized, named as, "VISHWAKARMA TRADERS (THE COMPLETE AIRCONDITION SOLUTION), GALA NO.6, AKBAR MARKET, SHAILENDRA NAGAR, NEAR OLD POLICE STATION, DAHISAR EAST, MUMBAI- 400068".

..२/-

Information provided must support with legal documents.

B. Provide me the certified permission copies given to construct mezzanine floor with ladi coba slab at, "VISHWAKARMA TRADERS (THE COMPLETE AIRCONDITION SOLUTION), GALA NO.6, AKBAR MARKET, SHAILENDRA NAGAR, NEAR OLD POLICE STATION, DAHISAR EAST, MUMBAI- 400 068".
Information provided must support with legal documents.

C. Measurements (Length-Height-Breadth) of, "VISHWAKARMA TRADERS (THE COMPLETE AIRCONDITION SOLUTION), GALA NO.6, AKBAR MARKET, SHAILENDRA NAGAR, NEAR OLD POLICE STATION, DAHISAR EAST, MUMBAI- 400 068".
Information provided must support with legal documents."

अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २२.०१.२०१८ संलग्न केलेले आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसांत निशुल्क माहिती द्यावी असे आदेश दिले होते. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असे नमुद केले की, आतापर्यंत त्यांना कोणतीही माहिती प्राप्त झालेली नाही.

सुनावणीच्या वेळी विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी असे सादर केले की, अपिलार्थी यांच्या अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर केलेली कारवाई बाबत कोणतीही कागदपत्रे कार्यालयात आढळली नाहीत.

वास्तविक तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी या अधिनियमाच्या कलम ७(१) अन्वये ३० दिवसांत माहिती पुरविणे अथवा नाकारणे आवश्यक आहे. परंतु तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी तसे केल्याचे दिसून येत नाही. यास्तव त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम ७(१) चा भंग केला आहे. अपिलार्थी यांनी माहितीचा अर्ज दि. २७.११.२०१७ रोजी सादर केला असून माहिती पुरविण्यामध्ये १०० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागला आहेत. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचेविरूध्द माहिती अधिकारी अधिनियम, २००५ च्या कलम २०(१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये. याचा लेखी खुलासा मागविणे आवश्यक आहे.

..३/-

तसेच अपिलार्थी यांना माहिती आवश्यक असल्याने, आता विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागितलेली माहिती पुरविणे योग्य हाईल.

अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच उभयपक्षांचा युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती दिलेली नाही. यास्तव आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१) तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि. २७.११.२०१७ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरून विहीत मुदतीत अथवा त्यानंतर देखील माहिती पुरविली नाही. म्हणून त्यांचेविरूध्द माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या २० (१) अन्वये रू. २५,०००/- ची शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी खुलासा ३० दिवसांत त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरून शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.**

**२) विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध माहिती ३० दिवसांत नोंदीकृत टपालाव्दारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अंतर्गत कलम ७(६) मधील तरतुदीच्या अनुषंगाने, निशुल्क पुरवावी. जी माहिती उपलब्ध नाही त्याबाबत मुद्देनिहाय स्पष्ट व विविक्षित उत्तर अपिलार्थींना ३० दिवसांत पाठवावे.**

**३) अपील निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission ★ Greater Mumbai ★

**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

**मुंबई**
**दिनांक : १०.१०.२०१९**

**टिप: सदर आदेशाच्या सर्व पृष्ठांवर मा. आयुक्तांनी स्वाक्षरी केलेली आहे.**

**प्रत पुढील कार्यवाहीस्तव:-**

तत्कालीन जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२. (मार्फत:- विद्यमान जन माहिती अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका सहा. आयुक्त, आर/उत्तर विभाग यांचे कार्यालय,संगीतकार सुधीर फडके उड्डाणपुलाखाली, जयवंत सावंत मार्ग, बोरीवली (प), मुंबई-९२.)